सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन
# महाराष्ट्र लोकसेवा आयोग
त्रिशूल गोल्ड फिल्ड, प्लॉट नंबर ३४, सरोवर विहार समोर, सेक्टर ११, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई-४००६१४ ०२२-६९३८५९००
Email ID : contact-secretary@mpsc.gov.in Website : https://mpsc.gov.in , https://mpsconline.gov.in
@mpsc_office @official_mpsc

क्र. १६३(२)/२०२२/१९ दिनांक: ०१ नोव्हेंबर, २०२३

## -: प्रसिध्दीपत्रक :-

**विषय:- महाराष्ट्र वनसेवा (मुख्य) परीक्षा-२०२२ अंतिम निकालाबाबत...**
**संदर्भ:- जाहिरात क्रमांक ०८७/२०२२, दि.३०/०९/२०२२ व अधिसूचना क्रमांक १२/२०२३, दि.२/३/२०२३**

महाराष्ट्र लोकसेवा आयोगातर्फे दिनांक २७ व २८ जुलै, २०२३ रोजी महाराष्ट्र वनसेवा सेवा (मुख्य) परीक्षा-२०२२ करीता मुलाखती घेण्यात आलेल्या परीक्षेचा अंतिम निकाल दिनांक ०१ नोव्हेंबर, २०२३ रोजी जाहीर करण्यात आला आहे.

२. सदर परीक्षेमध्ये सोलापूर जिल्हयातील श्री. ताकमोगे अक्षय शरद (बैठक क्रमांक MB००११७७) हे अमागास वर्गवारीतून आणि सातारा जिल्हयातील श्री. खाडे सुरज मारुती (बैठक क्रमांक MB००१०७२) हे मागासवर्गवारीतून राज्यात प्रथम आले आहेत. तसेच अहमदनगर जिल्हयातील श्रीमती तागड अश्विनी सुदाम (बैठक क्रमांक MB००१२६५) या महिला वर्गवारीतून राज्यात प्रथम आल्या आहेत.

३. उमेदवारांच्या माहितीसाठी प्रस्तुत निकाल व प्रत्येक प्रवर्गाकरीता शिफारसपात्र ठरलेल्या शेवटच्या उमेदवाराचे गुण (Cut off marks) आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आले आहेत.

४. प्रस्तुत निकालाधारे शिफारसपात्र ठरलेल्या सर्व उमेदवारांच्या शिफारशी विषयांकित परीक्षेच्या आवेदनपत्रातील दाव्यांच्या पृष्ठयर्थ नियुक्तीच्यावेळी त्यांची पात्रता मूळ प्रमाणपत्रांवरून तपासण्याच्या अटीच्या अधीन राहून शासनाकडे करण्यात येत आहे. उमेदवारांनी आवेदनपत्रात दिलेली माहिती खोटी अथवा चुकीची आढळून आल्यास अथवा आवेदनपत्रातील दाव्यानुसार आवश्यक प्रमाणपत्रांची पूर्तता नियुक्तीच्यावेळी न केल्यास तसेच शासनस्तरावर अधिसूचनेतील तरतूदीनुसार दावे तपासतांना व अन्य कारणांमुळे अपात्र ठरणाऱ्या संबधित उमेदवारांची उमेदवारी कोणत्याही टप्प्यावर रद्द करण्यात येईल.

५. प्रस्तुत परीक्षेचा निकाल समांतर आरक्षणाच्या व अन्य मुद्दयांसंदर्भात विविध मा. न्यायालयात / मा. न्यायाधिकरणात दाखल करण्यात आलेल्या न्यायिक प्रकरणातील अंतिम न्याय निर्णयाच्या अधीन राहून जाहीर करण्यात आला आहे.

६. सदर शिफारस यादीनुसार आरक्षित पदांवर मागास उमेदवारांची शिफारस विहित प्राधिकरणाकडून तपासणी करण्याच्या अधीन राहून करण्यात येत आहे.

७. प्रस्तुत अंतिम निकालात अर्हताप्राप्त / शिफारसपात्र न ठरलेल्या ज्या उमेदवारांना त्यांच्या उत्तरपत्रिकेतील गुणांची पडताळणी करावयाची आहे, अशा उमेदवारांनी गुणपत्रके त्यांच्या प्रोफाईलवर पाठविल्याच्या दिनांकापासून १० दिवसांत आयोगाकडे ऑनलाईन पद्धतीने (Online) विहित नमुन्यात अर्ज करणे आवश्यक आहे.

ठिकाण- नवी मुंबई

उपसचिव, परीक्षा-(राजपत्रित)
महाराष्ट्र लोकसेवा आयोग